


भिक्षुकाची जादू

एक चीनी लोककथा

भिक्षुकाची जादू

एक चीनी लोककथा

मराठी : अश्विनी बर्वे



भिक्षुकाची जादू

एक चीनी लोककथा





खूप पूर्वी एक दिवस चीन मध्ये एक अनोळखी व्यक्ती गावात आली. फू नान, जो आपल्या आई वडिलां बरोबर गावाच्या बाहेर एका शेतात राहत होता.तो सगळ्यात आधी त्या अनोळखी व्यक्तीला भेटला. त्याला वाटलं तो एक भटका संन्यासी असेल, अशा संन्यासांविषयीच्या गोष्टी त्याने ऐकल्या होत्या. एक संन्यासी तर जादू करु शकत होते, त्यांच्या अचानक प्रकट होण्याची फू नानला भीती वाटली होती.पण या अनोळखी व्यक्तीचे हाव-भाव खूप शांत आणि उदार वाटत होते. फू नानने विनयाने त्यांना नमस्कार केला.

“काही काळ राहण्यासाठी ही जागा चांगली आहे असे वाटते,” वृद्ध माणूस म्हणाला. “तू मला सांगू शकतो मी कुठे झोपू ते?”

फू नानने त्यांना एक विराण झोपडी दाखवली जी, गावच्या सीमेवर होती. तिथं वृद्धाने गवताचं अंथरूण तयार केलं आणि दरवाज्यावर एक कागद चिटकवून दिला. ज्यावर मोठे आणि विचित्र शब्द लिहलेले होते. वृद्ध त्याझोपडीत राहू लागला. रोज सकाळी फू नान आणि त्याचे मित्र झोपडीच्या खिडकीतून आत बघत आणि वृद्ध झोपेतून उठण्याची वाट बघत.

जेव्हा वृद्ध गावात भिक्षा मागायला जाई तेव्हा मुलांना त्यांच्या बरोबर राहयला आवडत असे. ते नेहमी प्रसन्न राहत आणि कोणता मोसम चालू आहे याकडे त्यांचं लक्ष कधी जात नसे. पाऊस असो, या ऊन, वृद्ध त्याच जुन्या चपला आणि जीर्ण पायघोळ कफनी घालून फिरत असे. सगळ्यांना माहीत होते की, भटकणारे संन्यासी निर्धन राहण्याचा संकल्प करतात. म्हणून गाववाले स्वच्छेने त्यांना तांदूळ आणि भाज्या देत असत.

फू नानने त्यांना आधीच सांगितले होते की त्यांनी जिल्ह्यातल्या सगळ्यात श्रीमंत व्यक्ती, कंजूष शेतकरी कधीही जावू नये. "जो भिक्षुक त्याच्या दारी गेला त्याच्यावर शेतकऱ्याने कुत्री सोडली होती," फू नानने सांगितलं.

मुलं नेहमी त्यांच्याबरोबर राहत त्यामुळे त्यांना सगळ्यात आधी कळलं की, वृध्द माणसाजवळ अनोखी शक्ती आहे.





.

एका सकाळी जेव्हा त्यांनी मुलांना अभिवादन केलं तेव्हा त्या वृद्धाला दिसलं की, टोपल्या करणाऱ्या माणसाच्या मुलाने एक पिंजरा धरलेला होता, त्यात एक चिमणी बंद होती. बिचारी फडफडत होती आणि पिंजऱ्याच्या बाहेर येण्यासाठी पिंजऱ्याच्या सळ्यांना टकरा देत होती.

“जर तुम्ही पक्ष्याला सोडून दिलं तर मी तुम्हांला एक जादू दाखवेन,” वृद्ध म्हणाला.

आश्चर्यचकित झालेल्या मुलांनी लगेच मान हलवून हो म्हटलं. वृद्ध झोपडीत गेले आणि एक काळा कपडा, शाई, एक पेन, कागद आणि एक ब्रश घेवून बाहेर आले. त्यांनी काळा कपड्याने पिंजरा झाकला. जेव्हा ते शाईत पाणी मिसळत होते, तेव्हा मुलं त्यांना गुपचूप बघत होते. त्यांनी झटपट ब्रश चालवला आणि पिंजऱ्यात अडकलेल्या पक्ष्याचे चित्र काढले. चित्र इतकं सजीव होतं की मुलांना वाटलं पक्षी आत्ता गायला लागेल. चित्रात त्यांनी पिंजऱ्याचे दार उघडं दाखवलं.





तेव्हाच चित्रातला पक्षी चिवचिव करू लागला. पिंजऱ्याच्या उघड्या दरवाज्यातून तो बाहेर पडला आणि कागदावरून उडून जवळच्या एका झाडावर जावून बसला. टोपली करणाऱ्या माणसाच्या मुलाने पटकन पिंजऱ्या वरचे कापड ओढले. आश्चर्याने फू नान आणि इतर मुलं ओरडली. पिंजरा रिकामा होता.

संन्यासी मुलांकडे बघून हसला. “तू एक चांगलं काम केलं आहे.” तो म्हणाला. “तुम्ही एका जंगली जीवाला स्वतंत्र केलं, त्याच्या प्रकृतीनुसार त्याला जगण्याची संधी दिली.”

“तुम्ही ही जादू मला शिकू शकता का?” फू नानने नंतर वृद्धाला विचारलं.

वृद्धाने प्रेमानं सांगितलं, “ही जादू शिकण्याआधी मला संन्यासी होण्यासाठी आपलं सर्वाचा त्याग करावा लागला होता.” मग मी अनेक वर्षे अभ्यास केला आणि संकल्प केला की या जादूचा उपयोग मी आपल्या फायद्यासाठी करणार नाही. तू अजून छोटा आहेस. आपल्या ध्येयासाठी थोडी वाट बघ.”



गावात फू नान कधी कधी एका गरीब विधवेला लियांग की ला मदत करत असे आणि भरलेल्या पाण्याची बादली गावातल्या विहिरीवरून उचलून तिच्या घरी नेवून देत असे. कारण तिच्या विहिरीतील पाणी संपले होते.

उन्हाळ्यात एक दिवस फू नानने संन्याशाला लियांग बरोबर बोलतांना ऐकले, “तुझी विहीर कशी पासून कोरडी आहे?”

“एक वर्षापासून. जेव्हापासून शेतकरी वू ने विहिरीत जाणारा पाण्याचा प्रवाह आपल्या नाशपाती बागेकडे वळवला,” लियांग म्हणाली.

“कदाचित मी तुम्हांला मदत करू शकेन,” संन्याशी म्हणाला. त्यांनी एक कळशी पाणी लियांगच्या विहिरीत टाकली. दुसऱ्या दिवशी बघितलं तर विहिरी गोड आणि निर्मळ पाण्याने भरलेली होती.

फू नान आणि लियांगने या दोघांनीच फक्त हा चमत्कार बघितला होता, पण काही दिवसानंतर संन्याशाची ही जादू सगळ्या गावाला कळली.

ऑगस्ट महिन्यातल्या पौर्णिमेच्या उत्सवाच्या दिवशी गावातील चौकाकडे जाणारे रस्ते बाजारात सामान विकायला नेणाऱ्या शेतकऱ्यांनी आणि व्यापाऱ्यांनी भरून गेले होते. फू नानचे आई-वडील कोबीच्या पाट्या घेवून बाजाराकडे निघाले होते. जेव्हा फू नान ने भिक्षूक संन्याशाला पाहिलं तेव्हा त्याने त्याच्या आईवडिलांना विचारलं की, तो त्या वृद्ध संन्याशा बरोबर चालू शकतो का?

फू नान संन्याशाला त्याच्या नव्या पतंगाबद्दल सांगू लागला, जो पतंग त्याला त्याच्या वाढदिवसाला मिळणाऱ्या पैशातून तो घेणार होता. अचानक त्यांच्या मागे रस्त्यावर काही आवाज यायला लागले. वू शेतकऱ्याचे गाढव जे नाशपत्तीचा गाडा ओढत होते,ते अचानक गर्दीच्या रस्त्यावरून पळू लागले. जास्त ओझ्याने दबलेलं गाढवाने अधिक जोरात पळावे म्हणून वू त्याला मारत होता आणि त्याच्यावर ओरडत होता.





फू नान आणि वृद्ध सन्यासी गावच्या बाजरात पोहचले तेव्हा, वू शेतकऱ्याने आपली नाशपत्तीचा गाडा लावला होता आणि तो त्या विकू लागला होता. खूप गरम होत होते त्यामुळे सगळ्यांना तहान लागत होती, आणि गोड, रसाळ नाशपत्ती खूप विकल्या जात होत्या. पण शेतकरी त्याचे जास्त पैसे मागत होता.


“तुम्ही मला तुमची एक स्वादिष्ट नाशपाती खायला देवू शकाल का?” संन्याशाने विचारलं.

“बाजूला हो, भिकारी कुठला! तुला काही मिळणार नाही. शेतकरी वू जोरात ओरडला..

“पण तुझ्याजवळ तर भरपूर नाशपत्ती आहे,” वृद्धाने नम्रतेने म्हटले. “तू नक्कीच एक नाशपाती मला देवू शकतो.”

त्यांचा वाद ऐकण्यासाठी लोक तिथं एकत्र जमले. कोणी म्हटलं, “इतका कंजूष होवू नको, म्हाताऱ्याला एक नाशापत्ती देवून टाक.” पण शेतकऱ्याने रागानं काठी फिरवली आणि संन्याशाला बरंवाईट बोलला.

फू नान नव्या पतंगाचे स्वप्नं बघत होता, त्याने ते विसरून आपल्या खिशात हात घातला. मी नंतर कधीतरी पतंग घेवू शकतो, त्याने आपल्या आपल्याला म्हटले आणि पटकन आपले पैसे वू शेतकऱ्याला दिले.




वाढदिवसाच्या त्या पैशाने फक्त एक छोटी नाशपत्ती मिळाली. संन्याशी हे तर बघत नव्हते की,नवीन पतंग घेण्याची त्याची इच्छा किती तीव्र आहे ते. फू नानने जमिनी कडे बघत आपल्या दोन्ही हातात नाशपत्ती ठेवून संन्याशाला भेट दिली.

खाली वाकून आभार मानत तो वृद्ध लोकांना म्हणाला, “तुमच्यातल्या अनेकांनी मला तुमच्यातले जेवण दिले आहे, म्हणून मी प्रत्येकाला एक स्वादिष्ट नाशपत्ती खायला घालेन.” ते गावातल्या चौकातून पुढे गेले आणि गर्दी त्यांच्या मागे मागे जावू लागली. इतर लोकांप्रमाणे वू शेतकरी सुद्धा गर्दीच्या मागे मागे जात होता.

संन्याशी चौकाच्या दुसऱ्या बाजूला उभे राहिले. त्या छोट्या नाशपत्तीला ते आपल्या दातांनी चावून खाऊ लागले. शेवटी तिचे एक काळे बी राहिले.

पाठीवर टांगलेल्या पिशवीतून त्यांनी एक फावडे काढले, माती खोदून एक खड्डा केला आणि त्यात्ते काळे बी लावले. “फू नान,” त्यांनी हाक मारली. “एका भांड्यात उकळते पाणी घेवून ये.”

जवळच्या चहाच्या दुकानातून फू नानने उकळलेले पाणी आणलं. वृद्धाने ते गरम पाणी मातीत टाकले.त्याच क्षणी एक हिरवे अंकुर मातीतून बाहेर आले. मिनिटभरात त्या अंकुराचे मोठं झाडा झालं. त्याच्या फांद्यांना पानं आली, कळ्या आल्या. फुलपाखरं आणि मधमाश्या त्याकडे आकर्षित झाल्या. फांद्यांवर पक्षी गाऊ लागले.





कळ्यांची फुलं झाली,फुलामधुन छोट्या छोट्या नाशपत्ती बाहेर आल्या. ज्या लगेच पिकून सोनेरी रंगाच्या झाल्या.वृद्धाने एका नाशपत्तीचा हुंगून वास घेतला. “मला वाटतं ही पिकली आहे आणि आपण हे खाऊ शकतो.” तो म्हणाला.त्यांनी नाशपत्ती तोडल्या आणि प्रत्येक गावकऱ्याला एक नाशपत्ती दिली. त्यांनी सगळ्यात मोठी आणि पिकलेली नाशपत्ती लियांगला दिली.


“गोड! रसाळ! रुचकर!” लोक म्हणाले. संन्याशाच्या जादूने ते आश्चर्यचकित झाले होते.

जशी शेवटची नाशपत्ती तोडली, झाड सुकायला लागले,त्याची पानं पिवळी पडली आणि ती खाली पडू लागली. ज्या फांद्या मजबूत दिसत होत्या त्या वाळून गेल्या.

“झाडाने सर्व फळं दिली आहेत,” वृद्ध म्हणाला. त्याने आपल्या कुऱ्हाडीने त्या झाडाला तोडले आणि त्याचे लाकूड लोकांना जाळायला दिले.

त्यांनी आपल्या हाताची धूळ झटकली आणि आपल्या पिशवीतून शोधून एक कागदाचा तुकडा काढला आणी तो फू नानला दिला. “जेव्हा तू घरी पोहचशील,” त्यांनी कुजबुजत त्याला सांगितले, “याला एका धाग्याने बांधून टाक आणि मग बघ काय होतं ते?”


मग हात हलवून त्यांनी सगळ्यांचा निरोप घेतला आणि डोंगराच्या रस्त्याने ते निघून गेले.



सगळे लोक एकत्र येवून त्यांनी पाहिलेल्या जादू विषयी बोलत होते. फू नानने कागदाचा तुकडा आपल्या खिशात ठेवला आणि तो आपल्या आईवडिलांना शोधण्यास निघाला.

गावच्या चौकातून रागवलेला आवाज ऐकून फू नान थांबला. लोकांनी शेतकरी वूला त्याचा गाडा जिथे उभा होता त्या जागेवर पाहिले. पण त्याची नाशपत्ती गायब झाल्या होत्या आणि त्याचा गाडाही गायब झाला होता. फक्त गाढव आणि गाड्याचे दोन फक्त तिथं होते.

तेव्हाच फू नानला समजलं. वृद्ध सन्याशाने वू शेतकऱ्याच्या सगळ्या नाशपत्ती गायब केल्या आहेत. चाकांना सोडून गाड्याचे इतर भाग झाड करण्यासाठी त्याने वापरले.



वू शेतकऱ्याला काय झालं ते समजलं होतं. चौकात जमलेल्या माणसांना ढकलत तो त्या संन्याशाच्या मागे धावत जात ओरडला, “त्या म्हाताऱ्या भिकाऱ्याला पकडा. त्याने माझ्या नाशपत्या चोरल्या आहेत.”

पण डोंगराच्या रस्त्याने जाणारा संन्याशी खूप लांब केला होता. वू शेतकऱ्याच्या मागे उभी असणारी ग्रामीण जनता जोर जोराने हसू लागली की त्यांना तिथं उभं राहणं मुश्कील वाटू लागलं.



त्या दिवसापासून वू शेतकऱ्याच्या नाशपत्ती हरवल्याची कहाणी गावातील लोक आपल्या मुलांना सांगत आणि त्यांना सूचित करत, “त्या मूर्ख शेतकऱ्यासारखं कंजुषीने वागू नका आणि शेवटी लोक तुम्हांला हसतील.”

त्या दिवसापासून टोपल्या करणाऱ्या माणसाच्या मुलाला आकाशात उडणारे पक्षी बघणं आवडू लागलं. पण त्याने कधी कोणता पक्षी पकडला नाही. लियांगच्या विहिरीत नेहमी गोड, स्वच्छ पाणी असे. उन्हाळ्यात सुद्धा पाणी असे..

आणि कागदाच्या जो तुकडा वृद्धाने फू नानला दिला होता, त्याचा एक मोठा, छान पतंग झाला. ऑगस्ट महिन्यातल्या चंद्रोउत्सवात जेव्हा त्याने आपला पतंग उडवला तेव्हा त्याच्या लक्षात आले की आजपर्यंतच्या त्याच्या सगळ्या पतंगात हा पतंग खूप सुंदर आणि मजबूत आहे. पतंगाच्या मांज्याला पकडत,हवेत पतंग उडण्याचा आवाज ऐकून, फू नानला वाटले की, तो वृद्ध संन्याशी त्याच्या जवळच आहे. एक दिवस, त्याने विचार केला की गावाचा त्याग करून त्या वृद्ध सन्याशासारखं पर्वतांवर जाणं योग्य होईल.



समाप्त